॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 | **Public Relations Office (PRO)** | website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215325 | जनसंपर्क कार्यालय | E-mail: pro@srtmun.ac.in

संदर्भ क्र.: ज.का./२०२४-२५/ १११ दि.२३/०८/२०२

## लोकसंस्कृतीच्या विकासात स्त्रियांचे योगदान महत्त्वाचे - संजीव भागवत




मराठवाडा आणि विदर्भाला मोठी लोकसंस्कृतीची परंपरा लाभली आहे. त्यामुळे येथील सामाजिक जीवनावर मातृसत्ताक व्यवस्थेचा प्रभाव राहिला आहे. लोकसंस्कृतीच्या उपासक असलेल्या स्त्रियांनी सामाजिक जीवनात महत्त्वाची भूमिका बजावली म्हणूनच लोकसंस्कृतीमध्ये स्त्रियांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन सकाळ चे वरिष्ठ पत्रकार आणि लोकसाहित्याचे अभ्यासक संजीव भागवत यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या स्त्री अध्ययन केंद्र, सामाजिकशास्त्रे संकुल आणि भाषा संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक लोकसाहित्य दिनाच्या निमित्ताने 'मराठवाडा विदर्भातील लोकसंस्कृतीतील स्त्रिया' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिकशास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. घनश्याम येळणे होते. तर प्रमुख उपस्थिती डॉ. दिलीप चव्हाण यांची होती.

पुढे बोलताना भागवत म्हणाले की, आज सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रामध्ये आपल्याला पुढे जायचे असेल तर नव्याने लोकसंस्कृतीच्या संशोधनाची गरज आहे. त्यातूनच स्त्रियांच्या गौरवशाली इतिहासाची मांडणी करता येईल. त्यासाठी संशोधक विद्यार्थ्यांनी आणि अभ्यासकांनी याकडे लक्ष दिले पाहिजे. असे त्यांनी आपल्या व्याख्यानातून सांगितले.

यावेळी कार्यक्रमासाठी डॉ. वैजयंता पाटील, डॉ. रमेश ढगे, डॉ. शैलजा वाडीकर, डॉ. प्रमोद लोणारकर, डॉ. नंदकुमार बोधगिरे, डॉ. नीना गोगटे, डॉ. नितीन गायकवाड, डॉ. आनंद घोडवाडीकर, डॉ. संदीप जाधव, डॉ. तातेराव पवळे, डॉ. प्रशांत घोडवाडीकर यांच्यासह विद्यार्थी, संशोधक हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गजानन इंगोले यांनी केले.

---